म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.



REFBK-0017545

# अग्निफुलं

प्रभाकर सातपुते

# अग्निफुले

REFBK-0017545

प्रभाकर सातपुते

कविता प्रकाशन मुंबई १६

प्रकाशक :
**प्रभाकर सातपुते**
काळु भुवन, पाचवा मजला,
ले. ज. रोड, माहीम, मुंबई-१६
□
प्रथमावृत्ती :
१० ऑगस्ट १९६९
□
© प्रकाशकाधीन
□
मुखपृष्ठ :
**प्रभाकर कदम**
□
मूल्य :
**दोन रुपये पन्नास पैसे**
□
मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग-कुलाबा

आई,

जखम वाहते
मिरवित तुरा शब्दांचा
या तुझ्या फुलांतुन
ठिबके रस अग्नीचा

—बाळ

प्रकाशक :
**प्रभाकर सातपुते**
काळु भुवन, पाचवा मजला,
ले. ज. रोड, माहीम, मुंबई–१६

□

प्रथमावृत्ती :
१० ऑगस्ट १९६९

□

© प्रकाशकाधीन

□

मुखपृष्ठ :
**प्रभाकर कदम**

□

मूल्य :
**दोन रुपये पन्नास पैसे**

□

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग–कुलाबा

आई,

जखम वाहते

मिरवित तुरा शब्दांचा

या तुझ्या फुलांतुन

ठिबके रस अग्नीचा

—बाळ

# तेथे असेल मंझिल...

एक तरुण कवी समोर येऊन उभा राहतो आणि विनयाने, आदराने किंवा बुजल्यामुळे अडखळत कविता वाचून पाहण्याची विनंती करतो. तेव्हा अशाच प्राथमिक अवस्थेत आपणही काही काळ व्यतीत केला अशा आठवणी येतात. भाबड्या मनाला प्रत्येक गोष्ट सुंदर दिसते. किंबहुना त्या वयाला सौंदर्याशिवाय काही दिसत नाही. ज्यांच्या त्यांच्या अंतःकरणात देशप्रीतीचा स्फुल्लिंग पेटलेला असतो किंवा उत्तुंग कल्पनांनी ज्या कवींची अंतःकरणं भारलेली असतात ते देशभक्त किंवा कवी यांच्याविषयी कविमनाला एक अनावर ओढ असते. प्रभाकर सातपुते यांच्यासारख्या उंबरठ्यावर असणाऱ्या कवीच्या मनात अशाच तऱ्हेची ओढ असणं अगदी स्वाभाविक आहे. साने गुरुजींच्याविषयी ते लिहितात :

शतका शतकातून जन्मती
धवल कीर्तीच्या थोर विभूती
चंदनासम देह झिजविती

किंवा देशासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांना उद्देशून ते म्हणतात,

मिसळून जाऊ दे याच जिन्दगीत आता
श्वासामध्ये श्वास।
...फासावर तुम्ही, महालात आम्ही, रक्त तुमचे
सिंहासन आम्हाला

सावरकरांच्याबद्दल ते लिहितात—

तुला जिंकिले काय सागरा तो मृत्युंजय झुंजार
आकाशाशी जुळले नाते शब्दचि फुलते अंगार

तर शहीद हमीदच्या बलिदानानंतर ते लिहितात—

अशी एक रात्र येते
शिरीषच्या निथळत्या रक्ताची
आई होऊन
अशी एक रात्र येते

शहीद हमीद-दिलीप गुप्तेच्या
पवित्र रक्तातील-थेंबांचे हृदय होऊन

अन्याय, असंतोष, दुराचार यांवर कवींचा नेहमीच राग असतो.

कवी म्हणतोः

राष्ट्र आज धोक्यात आहे
तरी वाढदिवसांचे कौतुक आहे
उत्स्फूर्त स्वागतांचे गीत आहे
जवानांची जान मात्र कवडीमोलाने जात आहे
दारिद्र्याने पीडलेले दुर्दैवी जीव
धान्यासाठी उन्हात तडफडत आहेत
त्याच वेळी कुणाकुणाच्या गळ्यात
सुवासिक फुलांचे हार पडत आहेत.

एका कवितेत कवी विचारतो,

जाग आता तू सह्याद्रि
वैऱ्याची ही रात्र असे
कशास परतीची पाऊलवाट
ही रणशूरांची जात नसे

मराठ्यांच्या इतिहासात त्यातील पराक्रमाने दीपलेले, अस्मितेने भारलेले कविमन तडफडते आणि उद्‌गारते,

विक्रम वैराग्याचे पहिले
इथेच होते जडले नाते

परंतु कवीच्या मनात आणखीहि काही कल्लोळ चालू असतात. चंद्र, सूर्य, पृथ्वी आणि तारे, या साऱ्यांनीच त्याचे हृदय भरकटलेले असते. त्याचे बालपण गाव, शिवार यांच्या ठायी पृथ्वीतील सारी सौंदर्ये तो बहाल करत असतो.

कवी म्हणतो,

काळाच्या उदरी कितीक वर्षे
संध्याछायासम विरत गेली

राकट बोथट आणि चंचल
आवरणे देहाची ती भासली

परंतु—

अजून पिंगा घालीत वारा
वेशीमधल्या कमानीतला

किंवा—

विश्वचक्राच्या गूढ चिंतनात
रस जीवनात ओतू कशी?
पेंगताना मी अवलोकिली
आकाशाची निळी झालर

ही निळी झालरसुद्धा केव्हातरी बालपणात कवीनं लपटलेलीच असते. कवीच्या भावजीवनात कुठेतरी एकाकीपण असतं.

तिमिराची क्षिति कुणाला
    या दीप्तिचा साज बहरता
निजदुःखाची तमा कुणाला
    स्फूर्ति फुलांचा सडा सांडता

असाही आशावाद मधूनमधून कवी दाखवित असतो. कधी कवीला जलकणांच्या हिंदोळ्यावर तृणांकूर व्हावेसे वाटते किंवा कधी मंदिराची पायरी व्हावेसे वाटते–तर कधी—

गर्द तरुंची व्हावे छाया
पांथस्थाचे मन सुखवाया
गिरिधरांचे व्हावे किरीट
आणि जनांचे फुलोत ओठ

कधी कधी त्याला सृष्टीचे गुपित कळते,

आले अलगद् हुंकार
भिजलेल्या मातीतून
आणि मम अल्पमतीला
कसे होईल आकलन

काही गीतातून भाविकतेने ओलावलेले कविमन दिसते,

फुलणारी पहाट भक्तीला जन्म देते.
नामाचा गजर करीत
वाळवंटात भक्ती भिजते
इंद्रायणीच्या डोहापाशी
तेव्हा मन भारावून जाते

तर मीरेची व्यथा शब्दांकित करताना ते लिहितात,

फुलवि येणे सुगंधातुनि गुन्हा काय प्रभुवरा
मी रे तुझीच मीरा।

एका उंबरठ्यावर उभ्या असलेल्या तरल वृत्तीच्या कवीच्या मनातील स्वप्नफुले या चिमुकल्या संग्रहात समाविष्ट केली आहेत. केवळ ताजेपणातसुद्धा पुरेसे सौंदर्य असते याचा तर प्रत्यय येईलच, परंतु सौंदर्याची स्वतंत्र चाहूल जाणावयाससुद्धा हरकत नाही. असं मात्र म्हणता येईल की, कवित्व ही दैवाधीन गोष्ट असली तरी रचना ही मात्र अभ्यासाने आणि व्यासंगानेच सुलक्षणी आणि सुदृढ होत जाईल. वृत्त किंवा छंद वापरायची असतील तर त्यांचे नियम चोखंदळपणे पाळण्यासाठी सिद्ध असले पाहिजे. नचपेक्षा छंद किंवा वृत्तांची बंधने झुगारून देऊन कल्पनेच्या वारूवर स्वार होऊन शब्दांच्या सामर्थ्याचा अंदाज घेत कवीला सारे अवकाश मोकळेच आहे. बंधने रसिकांसाठी असतात आणि ती वृत्त किंवा छंद यांची नसतात. कवीच्या दिलवर मनातून निघालेले सुस्कारे, हुंकार, हुंदके आणि कल्लोळ यांना पेलण्याची रसिकाची तयारी असली तर या लहान कवीतून मोठा कवी उलगडत जाईल; म्हणून या कवीला मी फक्त रस्ता दाखवीन. चिमुकली दिवटी धरून मी म्हणतो,

"मित्रा,

"तेथे असेल मंझिल रस्ता समोर आहे
तू पोचल्या क्षणाची मी वाट पाहताहे।"

ग. वा. बेहेरे.

# कथा 'अग्नि-फुलांची'

कळू लागलं... काही तरी सलू लागलं. दुःखावलेल्या मनानं मला न सांगताच शब्दांच्या आडोशानं जगायचं ठरवलं. शब्दांच्या पाखरांची फड-फड अशीच वाढू लागली. एके दिवशी अण्णा (कर्मवीर भाऊराव पाटील) म्हणाले, अरे, बरं लिहितोस तू. बऱ्या लिहितोस तू कविता. कळतात मला... मग अधून मधुन मनाचं आकाश भरून आलं की, पुनः पुन्हा शब्दांच्या पाखरांची फडफड चालते. ती अस्वस्थता मला लोभस वाटते. बी, गोविंदाग्रज, केशवसुत, तांबे, बालकवि, कुसुमाग्रज, बोरकर—पाडगावकर—ज्ञानेश्वर—तुकाराम यांनी माझे वेड वाढविले. तसे म्हटले तर जगण्यासाठी कुठले ना कुठले तरी वेड हे असावेच लागते.

...आकाश झाकळून येते...निरभ्र होते. एक आदरणीय रसिक भेटतो, प्रा. पद्माकर मराठे त्या रसिकाचे नाव–? मग तो रसिक म्हणतो, केव्हा करताय पुस्तकाचं प्रकाशन?...गति लाभते, मान्यवरांच्या, सहृदय मित्रांच्या सहकार्यातुन...पुन्हा मला न सांगता शब्दांच्या आडोशानं ही अग्नि-फुले फुलतच राहतात.

ओळख नसते. केवळ 'सोबत' वाचून प्रस्तावना मिळविण्याचे मी साहस करतो...एकाच वाक्यात समज मिळते. प्रस्तावना देण्यासारख्या कविता असतील तरच प्रस्तावना मिळेल...प्रस्तावना मिळते. तृप्ततेची भावना. मी आभार मानतो...त्यात काय विशेष? अहो, जग फार सुंदर आहे. खूप चांगली माणसं आहेत या जगात—त्या दिवसापासून माझी जगाविषयीची व्याख्या बदलते...

वेड लावणारा कोकणचा निसर्ग. त्याचा मी एक उपासक.

ज्यांच्या आशीर्वादामुळे 'अग्नि फुलें' फुलत राहिली ते मान्यवर प्रा. अनंत काणेकर, प्राचार्य म. वि. सहस्त्रबुद्धे, प्रा. पद्माकर मराठे,

प्राचार्य शिरसेंकर, सुधीर फडके, मंगेश पाडगावकर, लोककवि मनमोहन नातू, डॉ. श्रीरंग पाटकर, डॉ. हेमंत विंझे यांचा मी ऋणी आहे.

आमचे सहृदय मित्र प्रा. प्रकाश बन्द्रे, बाळासाहेब पण्डित, विठ्ठलराव चिंदरकर, रामचंद्र आचरेकर, विर्जे, श्रीकान्त कर्वे यांचे सहकार्य शद्बातीत.

माझे विद्यार्थी—त्यांची गरूड झेप. आवडायचे नाहीत त्याना मी आभार मानले तर—पण...दिलीप सावरकर, अशोक नागोटकर, दत्ता आंगणे, कु. जयश्री मांडे, सरोज शेण्डे, शोभा कुलकर्णी या विद्यार्थी—विद्यार्थिनींचा मी आभारी आहे.

मुखपृष्ठावरील चित्र आमचे तरुण चित्रकार मित्र श्री. प्रभाकर कदम यांचे. मी त्यांचा ऋणी आहे.

अगदी आपुलकीचे मार्गदर्शन— अलिबागच्या माधव मुद्रणालयाचे श्री. चिंतामणराव तथा अप्पासाहेब जोशी यांचे. श्री. अप्पासाहेब जोशी व माधव मुद्रणालयाचा सेवक वर्ग यांचा मी आभारी आहे.

रसिकांनो, ‘ अग्नि-फुलें ’ या काव्य संग्रहात काही चांगले असल्यास ते यश मला समजुन घेणाऱ्या मित्रांचे. आता तुम्हीच त्याचे स्वागत करावयाचे.

काळु भुवन,
५ वा मजला,
ले. ज. रोड,
माहीम, मुंबई १६.

आपला
प्रभाकर सातपुते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमा
अनुक्रम 62066 दि. 7/6/75
9974 9/6/60

# अशी माझी कविता


| | |
|---|---|
| १ तुजला नम्र प्रणाम | ११ |
| २ ते रम्य खेडे | १३ |
| ३. मावळती ज्योत | १५ |
| ४. का खन्त कुणा | १६ |
| ५. हितगुज | १७ |
| ६. विधिलिखित | १८ |
| ७. असा चंद्रमा | १९ |
| ८. मानस | २० |
| ९. व्यथा | २१ |
| १०. अस्मिता | २२ |
| ११. संग्रामाला जा विचारा | २४ |
| १३. गीत माझे | २५ |
| १४. त्या प्रभुला प्रणाम सांगा | २६ |
| १५. संवेदना | २७ |
| १६. ओंजळीत तुझ्या | २८ |
| १७. तू येणार म्हणून | २९ |
| १८. दैव | ३० |
| १९. जग | ३१ |
| २०. स्मृती | ३२ |
| २१. हुतात्म्यानो | ३४ |
| २२. निष्ठा | ३५ |
| २३. प्रसाद | ३६ |
| २४. रात्र | ३७ |
| २५. हवीस मजला | ३८ |
| २६. वसंत | ३९ |
| २७. कैदी | ४० |
| २८. झाले गीतचि धारा | ४१ |
| २९. मला वाटते | ४२ |
| ३०. गुपित | ४३ |
| ३१. चाहूल | ४४ |
| ३२. ढगा आड कां-? | ४५ |
| ३३. घाली पिंगा | ४६ |
| ३४. ओला सुगंध | ४७ |
| ३५. कला आणि जीवन | ४८ |
| ३६. असे कधी वाटू नये | ४९ |
| ३७. पुन्हा पेटू दे. | ५० |
| ३८. आणि जीवन | ५२ |
| ३९. तरी जीवन जगतं आहे | ५३ |
| ४०. असे मला स्वप्न पडू दे | ५५ |
| ४१. उपेक्षित | ५६ |
| ४२. अवीट गोडवा | ५७ |
| ४३. इवल्या मनात | ५८ |
| ४४. रुपेरी वाट | ५९ |
| ४५. घरकुल | ६० |
| ४६. अशी एक रात्र येते | ६१ |
| ४७. हे कधी बदलणार आहे ? | २ |
| ४८. तेव्हा मन भारावून जाते | ६४ |
| ४९. पूजा | ६६ |
| ५०. प्रणाम | ६७ |
| ५१. शल्य | ६८ |
| ५२. आकाशाच्या निळ्या डफावर | ७० |

७८५८५

## तुजला नम्र प्रणाम

(पू. साने गुरुजींच्या स्मृतीस)

तुजला नम्र प्रणाम
मुनिवर, तुजला नम्र प्रणाम

शतका शतकातून जन्मती
धवल कीर्तिच्या थोर विभूती
चंदनासम देह झिजविती
अगणित जीवन ज्योती फुलती

मात करुनि असह्यतेवर
साज शोभला अन् जीवनभर
कोमल हृदयी उठले काहुर
जनसेवेची मनी हुरहुर

ध्येयदीप तो स्वये तेवुनि
मांगल्याचं लेणं लेवुनि
तेजाळण्या ही अवघी अवनी
दिधला जीवन कलश ओतुनि

गरीबासाठी कण्‌कण् झिजला
आशादीप अन् तया दाविला
संगत तेजाची तिमिराला
प्रकाश अवघा भरुनि उरला

दिग्विजयाची भव्य पताका
पंढरीच्या मंदिरात असे का?
कितीक वदले तुकाराम तुवा
ममता आणि महान सेवा

अवाचित प्रभूची झाली किमया
चिर निद्रा-रे ठरली कासया
पडे दाट काळाची छाया
क्षणभंगुर ही सारी माया

रानफुले ही माझ्या हाती
लावीन प्रतिभेच्या फुलवाती
मनात प्रतिमा तव साकार
मम प्रतिभेला दे आकार

'आदर्श' डिसेंबर १९५८.

...... ग्रंथालय, बा... 
क्रमांक 62088 वि: काव्य
1925 नों दि: 21/5/...

## ते रम्य खंड

स्मृति पुष्पांचा सुगंध आणिक
सवे निसर्गाची शेज सोबत
संगीताची गोड लकेर अन्
नसानसातून ये फेसाळत

गृह शिखराने होते जाणीव
असावे कुशीत लपले गाव
फिरे कुंचला आणि मुलायम
भासे विधात्याचं कांचन गाव

काळाच्या उदरी कितीक वर्षे
संध्या छायासम विरत गेली
राकट बोथट आणि चंचल
आवरणे देहाची ती भासली

अजूनि पिंगा घालीत वारा
वेशीमधल्या कमानीतला
ध्वनी घुमतो आणि अलगद
चावडीतील मेळाव्यातला

जीर्ण देह घेऊनि उभा
अजूनि झुरतो आहे लिंब
ग्रीष्माच्या प्रखर झावळीत
शोधतो उभा राहून बिंब

आले कितीक वैशाख
देहाचा साज चालला विरत
खुळ्या त्याच्या मनास वाटे
अजूनहि फुलेल वसन्त

अजूनहि गीत गातो निर्झर
शिवाराला वळसा घालून
गुराख्याच्या बासरीचे सूर
आणि घेतात लक्ष वेधून

अजूनहि चालते नर्तन
आणि मोट करी कुई कुई
रुळतात कानात आवाज
फुलतात गीत-जाई

देवालयाच्या कौलारावर
करि घुटूर्घुम पारवा
सुखावते-फुलते मानस
गीतरवांचा मिळता गारवा

पडधम लेझिमांची—
कानावर खिळते-रुळते
रेशमी स्मृतींच्या हिरवळीने
आस फुलते-बहरते

'तरंग' मार्च १९५९.

# मावळती ज्योत

फुले हासरी अन् मुले हासरी
झुळूक लागे डोलतील नाचरी
हलके उमलती शुभ्र पाकळ्या
हसूनि दाविती बालीश वाकुल्या
हृदय मन्दिरी हर्ष अभ्रांचे
दाटूनि येता जग अगम्य वाटे
उमलती फुलती सत्ता ईशाची
साम्राज्य देखता मोद मनी दाटे
व्रत घेता का दिनरात हसण्या
जीवनात मानवी गोड भावना
हृदय मन्दिरी भरती चढता
पडसाद उठती बाह्य जीवना
कुसुमानो ! कशास जिणे जगता ?
अुमलताचि का क्षणीच मरण्या ?
अन्याय जगति तुम्हासहि ठावे
परि विकसता आल्हादचि देण्या
कठोर क्लृप्ति तव भाग्याची
क्षणी उमलुनि क्षणी मावळती
मने हासरी कोमजती सत्वरि
दुःख करणा जरि विझती ज्योती
उधळुनि गंध अमाप हृदयी
अतुल त्यागाचा किरिट लेवुनि
फुलराणी जगती मंत्र अर्पित
अन्ती न्याय जगाचा गोड मानुनि

# का खन्त कुणा ?

डोईवरति घेऊनि पाटी
तयात असती फळे गोमटी

जीर्ण जाहली काय लक्तरे
आस कशाची मनी आहे रे
म्लान मुखी आवाज रोकडा
सदैव विकसी फळे बापुडा
खन्त का ही असे जीवना
हृदयी आहे एक भावना

व्यर्थ धुंडशी जगती माया
यत्न तुझा हा जाईल वाया
कशास बा तू होशी खिन्न
जीवन ऐसे असते ' दो दिन '

होईल जगती माथा उन्नत
आंस अंतरिं असे अनंत
भविष्यात तू फुलवी जीवन
न्याय नीतिचे करूनी सिंचन

# हितगुज

उजाड त्या माळरानावर
अशीच होती रात्र पेंगत
मुक्या मनाचे बोल अनामिक
नीरवतेनं अशी उकलित
किती वर्षांची वाट अंधारी
म्हणे साहू कशी ? साहू कशी ?
विश्वचक्राच्या गूढ चिन्तनात
रस जीवनात ओतू कशी ?
पेंगताना मी अवलोकिली
आकाशाची निळी झालर
ठेचाळलेले माझे स्पंदन
फुलून उठले मदन्तर
रात्र नव्हती आता स्फुंदत
थिट्या मनाचे पंख लावुन
नव्हता चन्द्रमा फसवित
लपंडावाचा खेळ खेळुन
आठवणींच्या पागोळ्यांची
रित्या मनाला गवसे सोबत
उमटत्या पावलांची साक्ष
वाळूतून आहे डोकावत

'आदर्श' मे १९६०.

# विधिलिखित

(गौतम-अहिल्या)

काळ ग्रीष्माच्या प्रहारानं
जीवनपुष्प गेले कोमेजून
स्वामींची गोड सेवा चाकरी
ही अभागी ! गेली अर्ध्यात टाकून
नच ठरला फोल विधिलेख
जागी इतिहासाची कितावत
पतितेची भाग्यरुपरेषा नमूद
चित्रगुप्ताच्या रोजनिशीत
सुख संसाराचा कापूस
सुलभतेनं होते मी पिंजत
जडावलेल्या पापण्या उचलून
काळाची झाली मजवर जीत
फुलत होते माझे जीवन
गौतमाची अहिल्या म्हणून
माप सुखाचे भरले शिगोशिग
जीवनवेल ये डवरून
एके दिनी स्वामीजी वदले
ऊठ अहिल्ये उषःकाल झाला
ना खन्त ना खेद
काळ झेप टाकित आला
काळाच्या निखाऱ्यावर होरपळून
होय परिसीमा माझे नीरस जीवन

निस्पृहता कडाडली आवर्जून
हा शाप! पडशील शिळा होऊन
देवराया,
काय गवसलं सांग तुला?
टाकूनि दैवाचा उलटा फासा
गमतीचा झाला खेळ तुझा
ठरला माझा अंतिम उसासा
काळाची पिसे गेली झडून
पुनवेचा चान्द आला नटून
प्रभू रामाच्या पद स्पर्शानं
जीवन माझं गेलं मोहरून

ज्ञानदूत २० नोव्हेम्बर १९६०

## असा चन्द्रमा

शुभ्र चांदणे गोड फुलते
आकाशाच्या नील देठातून
नील काळसर वस्त्रामागे
असा चन्द्रमा जाओ पेंगून
दुधाळ फेसाळ अधीर मन
नयन घेती चांदणं टिपून
नऊ लाखाची सारी दौलत
असा चन्द्रमा जाओ टाकुन

# मानस

जीवन वीणेचा सूर लागता
मला एक लकेर होऊ दे
आकाशीच्या फुलातील
मला एक फूल होऊ दे
तव थोरवीच्या गिरीशिखरात
मला सान टेकडी होऊ दे
तव विश्वाच्या अगाधतेत
माझा एक शब्द फुलू दे
झुळझुळणाऱ्या निर्झरातील
मला एक वळण होऊ दे
रखरखलेल्या माळरानावर
मला दंवबिंदूचा थेंब होऊ दे
शिणलेल्या पांथस्थासाठी
मला तरुछाया होऊ दे
उपेक्षितांच्या अंतरंगातील
मला आक्रंदन करू दे
रंजल्या पोळल्या जिवासाठी
मला जलकण होऊ दे
मानवतेच्या मंदिरातील
एक मला पाईक होऊ दे
वादळातील नौकेचे
मला एक सुकाणू होऊ दे

चित्रकाराच्या कुंचल्यातील
मला रंगत उमजू दे
भक्तिरसातील अवीटतेचा
मला निज हव्यास असू दे
शारदेच्या लक्ष दीपात
माझी सांजवात तेवू दे

' ज्ञानदूत ' एप्रिल १९६१

९७५८५

## व्यथा

माय ! पुन्हा नाही मी येणार
उपवासी मी आणि
कडेवरचे पोर
या दुःखी जिवांसाठी
मन होऊ दे थोर
दैवाच्या वावटळीत
झाला देहाचा पाचोळा
सांगता आत्मकथा
दाटून येतो गळा

# अस्मिता

विक्रम वैराग्याचे पहिले
अिथेंच होते जडले नाते
बलिदान इमान राखले
फुलली मराठी गीतें
अिथेंच स्फुरली ज्ञानेशाची
रसाळ अमृतवाणी
अमर गाथा सन्त तुका
—देहूचा वाणी
सून परक्याची इथें झाली
अशी आमुची माता
शिवबाविण कोण जन्मला
असता तिजला त्राता
राजपुतांच्या जोहाराची
अिथेच जळली चिता
चारित्र्याची कमान चढवी
अिथेच पद्मिनी प्रेषिता
हुरड्यावरती भूक भागवी
स्वातंत्र्याची लाज
प्रतापराणा शूरत्वाचा
एक आगळा साज
उभविली विक्रम मन्दिरे
इतिहास गंगे तटी

याच ठिकाणी पुण्यशीलांच्या
जाहल्या गांठी भेटी
स्वातंत्र्याच्या सरितेसाठी
ओतले रक्ताचे दान
मातीच्या कणाकणावर
चिर सौभाग्याची खूण
शाहीरांची डफावरती
अचूक पडली थाप
रसना–लेखणी अशी नांदली
यवनांचा थरकाप
मराठी रक्ताने इथेच
रंगली माती
राम-सीतेची इथेच
फुलली प्रीती
या मातीने दिला
वाल्याचा वाल्मिक ऋषी
रामायणाची स्वरगंगा
अवतरली दाराशी
धन्य मराठा–धन्य मराठी
धन्य तिची लेकरे
अस्मितेच्या क्षितिजावर
येऊ दे नवे नवे तारे

'स्वरमेळ' एप्रिल १९६२.

## संग्रामाला जा विचारा

जाग आता तू सह्याद्रि
वैऱ्याची ही रात्र असे—
पत्थर पत्थर सह्याद्रीचा
तुझ्याचसाठी हसला शिवबा
माय कुणाची व्याली सांगा
कुणी उभारला सवता सुभा
तो संताजी मुरार–बाजी
हांकेसरशी पुन्हा येऊ दे
रंगलेल्या या मातीतून
देशभक्तीचे निखारे फुलू दे
भ्रांत अम्हा नाही पडणार
क्रांतीवीरांनो बलिदानाची
इतिहासाच्या पानावरती
साक्ष उमटे पावन रक्ताची
पडता पडता घायाळ करा
हीच आमुची जिद्द असे
आक्रमकांच्या वांधा कबरी
हा श्वासातील हुंकार असे
कशास परतीची पाऊलवाट
ही रणशूरांची जात नसे
म्यानावाहेर तलवारीला
रक्ताचीच लाज असे
फुलवुनी शब्दांचा फुलोरा
आजवरी आम्ही नाही लढलो

संग्रामाला जा विचारा !
आम्ही मराठे कशात भिजलो !
त्या नौबती पुन्हा वाजतिल
होशिल धन्य तू शिवराया
डिंवचलेल्या या सिंहानें
गर्जतिल दाही-दिशा

'स्वरमेळ' एप्रिल १९६२

## गीत माझे

गीत माझे वहरून येते
प्राजक्ताची फुले सांडता
आज मनाच्या मांगल्यातून
संस्कृतीच्या पावनतेतून
भावफुलांच्या गीतलयीतून
अमृत कलश का होती रिते....
कर्दमांतहि पंकज फुलता
तिमिरातहि हिरे झळकता
ज्ञानदीपहि जगी उजळता
जीवन वेलहि डवरून येते....
संत जनांच्या जीवनातील
पामरांच्या रुदनांतील
तरु-पर्णांच्या समर्पणातील
अर्थ गवसता मीपण सरते....

## त्या प्रभूला प्रणाम सांगा

दारिद्र्याची जळते चिता
झुकते शरीर आणि माथा
थकली गात्रे थकले लोचन
अशातहि जो फुलवी जीवन....त्या प्रभूला....

निज श्रमानं उठती इमले
मानवतेची हीच दालने
या वासाचा छंद कुणाला
उपेक्षितांची कणव कुणाला....त्या प्रभूला....

पाषाणातुन पाझर फुटती
रित्या पोटी घाम गाळती
रथ जीवनाचा असाच चाले
कोण तयांना अपुले बोले....त्या प्रभूला...

पुष्पांचे जे कंटक होती
गाते त्याची हे जग महती
धनी बोलविता कोण कुणाचा !
या फुलातील श्वास कुणाचा ! !....त्या प्रभूला....

## संवेदना

फुलत रहावे चांदण्याने
आकाशीच्या नील देठातून
सुगंधाने दरवळावे
मानसीच्या मंदिरातून

तिमिराची क्षिति कुणाला
या दीप्तिचा साज बहरता
निज दु:खाची तमा कुणाला
स्फूर्ति फुलांचा सडा सांडता

दु:खात बुडाली जी जीवने
कोण तयांचे पुसणार आसू ?
चाकोरीच्या कर्दमातील पारवे
बनती जीवघेणे जिज्ञासू

थैमान वादळाचे, थांबणार कुठे ?
शीडाविण गलबते
आणि जाणार कुठे ?

# ओंजळीत तुझ्या

ओंजळीत तुझ्या
माणिक मोती
मायेचा राजहंस
फुलवी प्रीती
आलीस तू आणि–
हेंदकळलं जल
माझं आशा स्वप्न
आज अंकूरलं
पदराच्या शिडांत
भरलं वारं
नकळत लागलं
किनारी तारुं
त्यागाचा कापूर
स्वयें जाळून
सुगंध जीवनाचा
दिलास उधळून
तव गुणांचे पैंजण
मृदू निनादले
या रंगभूमीवर
ठसे उमटले
त्या ठशानं घेतला
आत्म्याचा ठाव
आणि दोहोंचा आज–
एकच गाव.

# तू येणार म्हणून

ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
62011
दि: ९/८/७०

हिरव्या चाफ्याचा सुगंध लेवून
आलीत भिजलेल्या स्वप्नांची फुले
मम हृदयाचे कवाड खोलून
हृदय-उद्यान असे विकसले—
तू येणार म्हणून.

जीवन कासारी थरारले जल
लहरत उठले गोड वलय
मायेच्या शिम्पल्यातील माणिक मोती
तुझ्या सेवेसाठी ठेवते विखरून—
तू येणार म्हणून.

सौख्याची ऊब आहे विहरत
आज नाविन्याचे पंख लावून
शेज फुलविते मनाची कोकिळा
गोडव्याचे जीवन गीत गाऊन—
तू येणार म्हणून.

हवासा तो गोड जीवन सुगंध
जीवापरि मी केला आहे जतन
तुझ्या अशा अपूर्व स्वागतास्तव
पहाते केव्हाची हृदयाचे डोळे लावून—
तू येणार म्हणून.

पहात होते मी आकाशाची फुले
हृदयी साक्ष पटे साफल्याचे मळे
हृदयदेवतेनं दिला मला कौल
हा प्रसाद घेऊन आज मी अबोल—
तू येणार म्हणून.

# दैव

हे निष्पर्ण वृक्षा !

जीर्ण जाहलेले शरीर
आजवरि मी अवलोकिलं
उजाड या माळरानावर
माझी कुटीर आणि तुझीच सोबत

बालपणाच्या रम्यतेपासून
कितीदा घेतलेस लक्ष वेधून
हिरव्या तव पर्णांनी भरला साज
अन्तरीचे गुलाब गेले फुलून

जगाची रीत निर्मियले माहेर-सासर
उलथले माप, चढले उंबरठ्यावर
सुखाची राशी आणि दुःखाचा पर्वत
दिली विधात्यानं जन्मभर खन्त आणि खन्त

माळरानावरील त्या माझ्या झोपडीत
आले परतून मायपित्याच्या छायेत
कपाळ पांढरं माझं बघून
आला आओचा ऊर भरून

कुणा करिता नाही थाम्बला
आजवरि हा निर्घृण काळ
आणि या जीर्ण देहाचा अस्त
येत आहे जवळ जवळ

हे निष्पर्ण वृक्षा !
जीवनभर तुझीच साथ
जीवनं आपुली झाली शुष्क
अविरत फिरणार विश्वचक्र
कुणा आणि कशाला सांगू शोक

## जग

( आईस–एक श्रद्धांजलि )

तुळशीच्या वृंदावनी
सुकल्या रोपा ना अंकुर
नाही फुलत पारिजात
आणि तुझ्या हातचा गुलमोहर
ठाऊक नव्हतं तू असता
जग एवढं मोठं असेल
शब्दांच्या फुलावर—
जखमांचेच घरकुल असेल
वाट निबिड अंधाराची
तरी पाऊले टाकायला हवी
तुझ्या वात्सल्याच्या पूजेसाठी
मला फुले वेचायला हवी

# स्मृती

(पडक्या देवळाचे आत्मवृत्त.)

पूजियले मम श्रद्धेच्या ओलाव्यानं
दीप तेवुनि त्यागाचा मनसोक्त

क्षण सोनियाचा मज गमतसे
कीर्तिसागरात हो मन उद्युक्त

उत्स्फूर्त फुललें आशेचे अंकूर
डोलते गर्वानं आस देव्हाऱ्यात

नित्य पेरियले हृद्याचे बोल
गोडव्यानं मायेच्या नित्य सुखात

थैमान स्मृतिलाटांचे सागरात
फेसाळ स्मित करितसें बेभान

उंच भरारी घेई मनोविहंग
उमलूनि हांसे आत्म्याचं उद्यान

शरीरसाज सजविले अन्तर्बाह्य
खुलविते मन ' सुख-चंद्रकोर '

दिधला सुगंध कापूर जाळुनि
' स्मृति ज्योत ' स्वये तेवत अमर

वेलीस प्रीतीच्या श्रद्धेचा बहर
सागरास श्रद्धेच्या येई उधाण

लागेल ओहोटी नच क्लृप्ती मम
गोड आशेचे विरले सुखस्वप्न

होती जनता गूढ श्रद्धेने धुन्द
होते शिखर कळस झुलवित

होती तेवत सुखाची सांजवात
होती जाहली धुन्द मानसज्योत

असता पेंगाळत सुखात मन
असता तेजोवलये तबकात

असता ज्योतीत सुगंध अमाप
असता सार्थकता मम जीवनात

कशास खेद मनाच्चिया सुखास
कशास कोमेजावी वेल

कशास व्हावे मृदू जीवन गीत
कशास लोपावे ह्रद्याचे बोल

कुणी करील घात न आले स्वप्नांत
कुणीं पेरील विष या ह्रद्यात

कुणीं चोरील मायेचा समीन्दर
कुणी रुतवेल खंजीर सुखात

न आले कधी मनात झेंपावत
न आले बोल तोडून सुखमाळ

न आले वायू फेकूनि सूत्रधार
न आले वायू धुंदीचे दीर्घकाळ

हाय ! हाय ! ! असह्य मम जीवन ! ! !
जीर्ण शरीर भकास नंदनवन

पाश काळाचे करिती मृतप्राय
स्मृति कोणास? ‘ भाग्योदय सुदिन !
वेच्चिराख आशा अमर्याद निराशा
नुरली सुखकीर्ति ! जमिन दोस्त ! !
सौख्य गारद काळाच्या उदरात
रिझविले क्षणात आशेचा अस्त
कासया अवलोकावा विदीर्ण देह
कासया जनता करिल वन्दन
कासया आडविला म्या ध्येयमार्ग
कासया श्रवेल श्रद्धेचे ‘ कूजन ’

## हुतात्म्यांनो

मिसळून जाऊ दे याच जिन्दगीत आता श्वासामध्ये श्वास
वलिदान तुमचे आमच्यासाठी, उरले केवळ निःश्वास
हुतात्म्यांनो, जगता आले तुमच्यासारखे तर धन्य होओीन
क्षण एक मरता आले तुमच्यासारखे तर धन्य होओीन
जान कुर्बान स्वातंत्र्यासाठी, आता असत्याला सत्याचा वास
समर्था घरचे श्वान ठेवते कोंडून मानवतेचा श्वास
शहीदो, जमाना बदला—आझादीसाठी आता कुर्बानी नाही
आमचा मुकाबला आमच्याशीच, देशाशी काही घेणे नाही
फासावर तुम्ही, महालात आम्ही, रक्त तुमचे सिंहासन आम्हाला
सोसतो जान आहे तोवर, ठिणगी उडेपर्यंत बोलतो कशाला !

# निष्ठा

दारी केव्हांची उभी
आहे मी भिजत
झाले अंग ओलेचिंब
गात्रे झालीत शिथिल
येथेच तिष्ठते मी
समाधी भंग न व्हावी म्हणून
खन्दा चित्रकार तू
पिते मी कीर्तिसुगंध
कुंचल्यातून जन्माला
येई प्रतिमा साकार
वेड्या मनास वाटे
केधवा फुलेल ऋतु वसन्त
तुझ्या रुंदशा खांद्यावरून
नजर माझी फिरते
घेते नयनाचे ओठ मिटून
झाले मी कृतार्थ !
आणि........
नजर तुझी वळते
नयन लाजरे जाती थबकून

## प्रसाद

हे प्रभो !

लहरत्या सलिलावर
फुलू दे जीवन

या कुडीतील पंचप्राण
होऊ दे तव गान

देहाच्या पिंजऱ्याला
तव ममतेच्या तारा

आत्म्याच्या विशालतेवर
श्रवू दे अमृतधारा

कणखर छातीचे वरदान
अखंड प्रतिभेचे नंदनवन

वदलास तू....
मानव माझीच भव्यकृती

मग.... !
प्रगतीचे मधुघट का रिते होती ?

सुखदुःखाचे गडद रंग
जाहलो पिऊन धुंद-फुंद

केवळ तुझ्याच चाकरीत
जीवन होऊ दे जायबंद

आयुष्याचा कापूर जाळून
करीन मी तुझेच पूजन

या पामराची अल्पसेवा
                घेशील का गोड मानून
तव थोरवीचे दीप
                उजळोत जीवन पथ
विश्वाचिया सागरात
                चालू दे ही नौका संथसंथ

'ज्ञानदूत' जून १९६२.

## रात्र

मिणमिणत होता
                उशालगतचा दिवा
अंधाराचा पडदा फाडून
                प्रकाशाला मित्र हवा
रातकिड्यांचे किर्र संगीत
                नव्हते मना रिझवीत
झोपी गेलेले जग
                आणि पुन्हा होते पेंगत
मनाचा ससा होता बागडत
                सुखाच्या हिरवळीत
माझ्या जडावलेल्या पापण्यांना
                आज मिळे उषेची सोबत

# हवीस मजला

घट मिळता अमृत कुंभाचे
रस मिळता गोड स्फूर्तीचे
अभ्रे अहंकारांची जाती विरून
होते नतमस्तक प्रेमे भारून
मुक्त हस्ताने दिधले दान
काव्य देवते, तुला आले उधान
प्रतिभावंताना करतो मुजरा
द्या असा वारसा आम्हा पामरा
जाहले कितीकांचे जीवन धन्य
नच उरली आंस जगति अन्य
दरवळे कीर्तिसुगंध अमाप
असंख्य जीव सुखावती अमाप
अस्मानी चमकती असंख्य तारे
तव प्रासादी झडती नगारे
जन सागरा येते भरती
कौतुक-प्रवाहा मिळे गती
तपश्चर्येचे बीज पेरुनि
कितीक झाले चिरंजीव
जगाचिया अन्तापर्यंत
प्रज्वलित जीवन-ज्योत
नीरस आहे जीवन जगणे
तुझ्या संगती जीवन फुलणे
काव्य देवते, तुझीच पाखर
हवीस मजला तू जीवनभर.

# वसन्त

वहात होता गान निर्झर
याच डोंगर-कपारींतून
गीत-स्वरांचे मधुर ध्वनी
केले आकंठ प्राशन
दिसते हिरव्या साडीत
अजून उभी सान टेकडी
न्हालेल्या कोमलतेतून
ठिबकते सुन्दरता झणी
क्षण सुखाचा दिसे अजून
दरबार पक्षांचा भरे अजून
न भेद-भाव अन् सिंहासन
गुञ्जारवात ,जाती रंगून
तुझ्या देहाच्या मंदिरात
खुणा स्मृतीच्या तेवतात
थांबे क्षणभर अरसिक
सौंदर्याचे भाण्डार पीत
ग्रीष्मप्रहार तुला चाटता
कुरुपतेचा क्षणिक शाप
वसंतातील झाकलेल्या—
खुणा दिसती आपोआप
प्रकाश येतो अंधारातून
हे सुखी जीवनाचे गाणे
जीवनाचे गमक उमगता
समृद्धतेला काय उणे !

# कैदी

भयाण शांतता उरी डाचते
मंदिर नच स्मशान
कोण आसक्ति वेभान
कासया नुरेल 'दिन'

श्रवणी येती अन्तरीचे बोल
मंदिर मानवतेचे विरले

जखडले दोन हात
जाहली नैराश्याची मात
नुरले त्राण उरात

कोमजले आशेचे अंकूर
न ये सांगता कधी विझेल ज्योत

सौख्याची सुकली वेल
नाविन्य हो अनमोल
गतसंगीत सुरेल

येईल केव्हा मानसमूर्तीत
आसू ढाळावे कशास दिनरात

पदोपदी मनोभंग
गतस्वप्ने उत्तूंग
कशास यावी उबग ?

संग्राम होता मनोसागरात
अजाण जीवांची भाबडी आंस

क्षणाक्षणाला गर्तेत
गूढगती अविश्रांत
नच गोडवा स्फूर्तीत
दुर्दैव शत्रूचा भीषण भास
केधवा उजळले दीप मनीं
जेधवा स्वप्नाचि गोड
फुलेल मनी अजोड
अतुल साम्राज्य वेड
श्रवावे केव्हा संगीत जीवनी ?

## झाले गीतचि धारा

अनंतातुनि भाव रेखिते    मी रे तुझीच मीरा
निळाईतुनि आकाशीच्या    झाले गीतचि-धारा ।। धृ।।
गात आरती, तूच सारथी    प्रियतम मेघश्यामा
खचला रे रथ अर्ध्यावरती    ना मज त्याची तमा
फुलुनि येणे सुगंधातुनि    गुन्हा काय प्रभुवरा
जडले नाते केवळ तुजसी    असुनि सगे–सोयरे
हवे कशाला घरकुल मजसी !    मी तव जोगीण रे
फुलता जीवन पिऊन आसवे    आळविन गीत शतधारा
हालाहलाचा प्राशुनि प्याला    उद्धरिले जीवना
समाधीत या सूर निमाला    नाव तिचे साधना
भविष्यात मग ओठी येईल    एकच गिरिधर-मीरा

# मला वाटते

जलकणांच्या हिन्दोळ्यावर
व्हावे सानुकले तृणांकूर

कुशीत अैसे पेंगून जावे
मायभूनें अन् गोंजारावे

नवलाख दीपें नभो–मन्दिरी
भाग्यपरिं मज गवसावे

पंख फुटावेत साफल्याचे
हे मधुघट मानवतेचे

गर्द तरुंची व्हावे छाया
पांथस्थांचे मन सुखवाया

गिरीधरांचे व्हावे किरिट
आणि जनांचे फुलोत ओठ

पामरांचा होऊनि पथ
चालो तयांचा जीवनरथ

मंदिराची व्हावी पायरी
आगमन भक्तांचे मंदिरी

होऊनि निर्झराचे गाणे
अिप्सित मिळता काय ऊणे ?

आणि आशेला आहे उसन्त
तेवत राहो जीवन ज्योत

# गुपित

आले अलगद हुंकार
भिजलेल्या मातीतून
रुपगंधित आगळे
न्हालेल्या कोमलतेंतून
जडत्व ओल्याच लेवून
माती कशास भिजतसे ?
थिट्या वेड्या पिसाट मना ?
मायेची फुंकर देतसे !
तिमिरांतुनी प्रभेला
कोण आकार देतसे
जीवन संगीत सतार
कोण हलके छेडितसे ?
सरितेच्या उगमातुन
कोण मना रिझवितसे ?
तरुपर्णांच्या दाटीतून
कोण गीत आळवितसे ?
शुभ्र ताम्र त्या पटावर
अविरत नर्तन होतसे
दर्याच्या अंतरंगातुन
कोण बेभान होतसे ?
विधात्याची दिव्य भव्यता
चाले अविरत सिञ्चन
आणि मम अल्प मतीला
कसं होईल आकलन !

# चाहूल

दुर्दम्य आशा मनी घोळुनी
नित्यचि आगमन असे भूतला
स्वये करण्या माथा उन्नत
अतुल भूषण मानव्याला
गोड कवडसे क्षितिजावरती
सुमने सौख्याचीच उधळता
उत्स्फूर्त ठाकली दिव्यपंक्ती
अप्रतिम भाण्डार सत्यता
मंत्रमुग्ध किरण शलाका
असह्य होता क्षणी तीव्रता
सिंचन करुनि माधुर्याचे
सदनाचा मार्ग आक्रमिता
तेजोवलये शत पांथस्था
अर्पूनि सारा गोड मुलामा
सुगंध दरवळे मन्दिरी
प्रसन्न होई मनी चन्द्रमा
परिधानता सायं ताम्रपट
मने पेंगलेली अविश्रान्त
भासे उदास तव विरहात
दिसे मानव तव रुपात
साम्राज्य गगनचुंबी खास
विस्तारली बेटे ही सत्वरी
विकास–स्पर्धा काय भूवरी
गोड हासे मानस–मन्दिरी

असला जरी क्रम नित्याचा
उजळुनी जाई वसुंधरा
पाठ क्रमिक मानवतेला
शोभसी वीर सम्राट खरा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

अपूर्व थोरवी काय वर्णावी
शब्द-भांडार होईल रिते
हिरा कोहिनूर लखलखे
चरणी नमते मस्तक माते

## ढगाआड का–?

ढगाआड का चंदा लपसी
लपंडाव का असा खेळसी

तुझ्यास्तव रे असता तत्पर
निर्मियलेले हे बघ अम्बर
बिलगिसी का सदैव सत्वर
करुनी सलोखा मग वायुसंगे
वृथाचि ऐसा कैसा मिरविसी

हंसऱ्या चांदण्या येतां अंगणी
मोदे गातील तुझीच गाणी
मोहित होई मग नवराणी
फुलें उधळुनि सौख्याची रे
चोर पाऊले कशास पळसी

नवलाख दीपें नभीं लागली
गमते रोजची का दिपवाळी
अवीट गोडी नच उमगली
सत्वर येशील काय भूवरी
प्रसूत करण्यास्तव हेतू

## घाली पिंगा-

गगनास नित्य भिडण्याला
गुपित मनीचे वदण्याला

का उंच उंच जाता?
ताडांच्या झाडांनो

अलंकार तव विस्तृत मस्तक
पसरलेत सहस्रावधि हस्त

यावाच हस्तांना सुगंध अमाप
अथवा उठो गोड निनाद मनात

असतिल निसर्गाचे अश्रू ओसंडत
असेल तप्तभूमी स्नान करीत

असेल डवरत चन्दन सुगंध
असेल होत पांथस्थ मंत्रमुग्ध

नितान्तरम्य सौंदर्यभाण्डारात
अकल्पित फुलती गोड कवडसे

अवचित खिळते दृष्टी तुजवर
आणि वाटे भुर्र उडावे क्षणभर

चन्द्रचान्दण्या जणू झेलण्या
सदैव तत्पर हात तुझे

नाही कधी का वाटत ओझे
असता पेंगत मन तुझे

# ओला सुगंध

किनार आकाशाची चमकत
मन्द पवन होता सुखवित

झाली तरुंची अेकत्र दाटी
जलतुषार मधेच गाती

चपलतेची ओढ अनावर
पिता तियेचा असे गिरिधर

ज्वलंत वैशाख कितीक गेले
परि न त्रागा, जीवन आगळे

जसे चन्दन तसेच जीवन
असे जगाला सुटते सांगत

रीत जगाची परि अुफराटी
सत्यप्रेमीला मिळे न रोटी

रजनी तिमिरा घेअी सोबत
परि सरितेला नसे अुसंत

जात होती पति–सदनी
तिथे होतो मी नदी किनारी

रिझविणारी अशीच रजनी
नूतन होअून यावी प्रतिदिनी

प्रतिभा–सागरा यावी भरती
'ओला सुगंध ही धन्य धरती!'

# कला आणि जीवन

चित्रकार तो होता अगदी विख्यातचि झालेला
चितारलेलं चित्र तयानं लटके भिंतीला
स्वप्न जीवनाचं असं होतं त्यानं चितारलं
अन् कलेचं जीवन होतं त्यात रेखाटलं
पाऊल पहिले आज कलेचे, बिंबली गोड स्मृती
अमाप कीर्ति किरण शलाका ये क्षितिजावरती
कुशलतेचा कुंचला असे भाविष्य खुलवीत
क्षणाक्षणानं घडण मनाची असें घडवीत

जीवन त्याचं होत कलामय, आनंदा–भरती
मनःपटावर हलकें होओ चित्र-निर्मिती
असतिल तेथे असंख्य चित्रं त्यानं निर्मियली
चंद्रकोर परि एकचि हलके कोरियली
'प्राणाहूनि ती प्रिय गमते आज माझी मला–
सहज कुंचला फिरवित फिरवित चित्रकार वदला'
सुरेल संगीत स्फुरले सुखशय्येवरून
ठरला परि अखेरचा क्षण मृत्यू शय्येवरून

अमोल पदके तया लाधली जीवन–पूर्तता
दीप तेवले मानस मन्दिरी अन्य हर्ष कोणता ?
नवलाईनं कला–जीवन होत विकसित
मोहक सुमने स्मित करूनि होती डोलत.

# असे कधी वाटू नये

असे कधी वाटू नये—
रम्य ते गगन डुंबावे अंधारांत
तेजस्वी तारकांचा वर्षाव भूवर
खडखट् नभी व्हावी शांतता भंग
विरावे हर्ष कारंजे गळावे विचार मौक्तिक

असे कधी वाटू नये—
प्रशांत समयी पक्षाचे गोड गान
न भिडता हृदयात, भुरंऽ गगनात
गीत निर्झराचे वेडावित मनास
न देता आल्हाद विरजण सौख्यात

असे कधी वाटू नये—
मधुर बोल कोकिळेचे नको श्रवणी
फुटता कोमल पालवी व्हावी पक्व
सदैव न दरवळो आम्र सुगंध
न घ्यावा ठाव, मनाचिया परिपक्व

असे कधी वाटू नये—
उमलावी पुष्पे कशास उद्यानात?
कासया मोह अप्रतिम सुगंधात?
गगनी–उद्यानी, न उमलोत पुष्पे
अथवा उमलताचि गळो अमाप!!

# पुन्हा पेटू दे

क्रांतिवीरांच्या बलिदानातून
पुन्हा पेटू दे भारतवर्ष महान—
जय क्रांतीचा ! जय उद्घोषाचा
अनंताचे बलिदान
जय वाजीचा ! त्या निष्ठेचा
स्वामीचे वरदान
पुन्हा....

शिरावेगळे शरीर लढले
मुरार पौरुष बलवान
आईसाठी पुन्हा येईन
हा भगतसिंहाचा बहुमान
पुन्हा....

वीरांगना ती अशी लढली
पोरालाही पाठी बांधून
धन्य लक्ष्मी ! रण देवते ! !
गाऊ तुझे यशोगान
पुन्हा....

प्रवरातीरी पुन्हा फुलू दे
ओवी ज्ञानेशांची
इंद्रायणीच्या कुशीत भिजू दे
गाथा तुकयाची
भक्तीतून शौर्याचे आज मिळावे आव्हान
पुन्हा....

बाबू गेला—शिरीप पडला
जान अशी कुर्बान
क्रांतिफुलांच्या महानतेचा
आज होऊ दे सन्मान
पुन्हा....

तुटक्या हाताने लढलेला
सिंहगडावर पडलेला
सिंहगडाच्या कुशीत अपुल्या
स्वप्नासाठी विरलेला
नरवीराचे-त्या मित्राचे अता जागू दे इमान
पुन्हा....

अहिल्येच्या साध्वी व्रताचे
आज भिजू दे पानोपान
येसूबाईच्या मूकपणाने
फुलावी अबोलीची शान
पुन्हा....

इर्षेसाठी ! निष्ठेसाठी ! !
होऊ दे देहाची माती
मानवतेच्या ऐक्यासाठी
होऊ दे देहाची माती
पावनतेच्या गंगेलाही येऊ दे देशभक्तीचे
उधाण
पुन्हा

# आणि जीवन

काळाचा पिंजारी
कापूस पिंजतो आहे
जीवनाच्या प्रवासांत
मनाचा कापूस पिंजला जात आहे....पिंजला जात आहे

जीवनाच्या उद्यानांत
फुलें उमलली आहेत
आणि काळाच्या झेपेंत
आशेची फुलें कोमेजत आहेत....कोमेजत आहेत

मानवतेच्या मंदिरांत
माणुसकीचा सुगंध वहरत आहे
आणि नकळत....
अहंकाराची अभ्रं घेऊन
मायेची उशी पहुडली आहे....पहुडली आहे

गर्दशा हिरवळीवर
सुखाचे तुषार वागडत आहेत
आणि मौक्तीकबिंदूने मनाला
आशेची पालवी फुटत आहे....फुटत आहे

जीवनाच्या लढाईत
असह्य जखमा होत आहेत
घायाळमन ताज्या दमानं
सेनानी बनून टक्कर देत आहे....देत आहे

कर्तृत्वाच्या साखळीत
काळाची पाऊले खिळली आहेत
काळाला माघार घ्यावी लागणार आहे
आणि जीवन बदलणार आहे....बदलणार आहे

# तरी जीवन जगतं आहे

दारिद्र्याच्या काळोखात
दुःखाचा हुंदका दाटला आहे
आठवणीच्या कळशीत
नियतीचे पाणी असे हेंदकाळते
उपेक्षेच्या निखाऱ्यावर
श्रमिकांचे मन जळते आहे
पेटल्या मनावर
श्रमिकांच्या घामावर
कलावंत हातावर
निथळत्या रक्तावर
उभ्या हवेल्यांची मिजास आहे
पिऊन दुःख मन तग धरते आहे
तरी जीवन जगतं आहे
जात्यावरली ओवी भिजते आहे
ओठावर फुलते आहे
पेटत्या मनाची पणती
श्रद्धेवर जगते आहे
डोळ्यातील आसवांना
संयमाचा बांध आहे
पण सुपात धान्य कोठे आहे ?
तरी जीवन जगतं आहे

व्यथा अशी सलते आहे
व्यथा अशी जळते आहे
दारिद्र्य असे लोचट आहे
तरी जीवन जगतं आहे
सई-जाई अबोल आहे
जात्यावरली खडीसाखर अता विरली आहे
पण निष्ठेचा उंबर तोच आहे
म्हणून जीवन जगतं आहे

'मांडवी' दिवाळी १९६६

## असे मला स्वप्न पडू दे

मायेच्या वस्त्राची रेशमी किनार
घेऊन उभा आहे देवदूत
जीवन वीणेत
भविष्याची तार जुळली
असे मला स्वप्न पडू दे
साफल्याच्या मधुघटांतून
मांगल्याच्या पावनतेतून
श्रवत आहे
जीवन धारा
असे मला स्वप्न पडू दे
उठली असता दुःखाची उबळ
स्वर्गीय संगितानं जीवन धन्य
नयन शिम्पल्यातून
ओघळले मोती
असे मला स्वप्न पडू दे
नील रम्य गगनी उद्यानी
चंद्रमा विराजमाने विलसी
पडे सडा प्राजक्ताचा
जाहले नयन कृतकृत्य
असे मला स्वप्न पडू दे
सतारीचे बोल दीडदा दीडदा
रुळली पाऊले—रुतली बोटे
सूर लागला एकतेचा
फुलला आत्म्याचा बगीचा
असे मला स्वप्न पडू दे

# उपेक्षित

जन्मभरी तुम्ही फुलताचि असता
हसता हसता, प्राण अर्पिता
उदात्ततेचे करूनिया स्वागत
धुंडिता कशास मग शुभमुहूर्त ?

प्रशस्त हिरव्या गालीच्यावर
अन् मायेच्या सुखशय्येवर
खुशाल फेकता देह आपुला
अगणित गुंफता पुष्पमाला
स्मिते उमलती बालिश कोवळी
आगमनाते रवि उदयाचली

वायुलहरी सवे क्षणी पहुडता
मऊ गालीच्यावर माया ममता !
गर्द हिरव्या पिवळसर पर्णांची
आवरणें देहावर मग शाल्कूंची

ताप दुखणें मग नसेल ठाऊक
अवलोकिता, यास्तव नेत्रदीपक
अशाच एका नितान्त रम्य कासारी
होत्या विकसत तव जीवन-लहरी

दृष्टी खिळली मग, दृश्य मनोहर
अधीर वदले गोड भाव सुस्वर
प्रकाश असता हलके उजळत
असता चन्द्रमा चान्दण्या शोधित

एक जिवाणू निपाचित पडे काय !
पाषाण हृदयी ! कासया केली सोय ! !
मम पथावर दिसले अवचित
स्फुन्दत असता, अन्तरी आसू ढाळीत
वदले उफाळत क्षणी आर्त निखारे
निष्ठुर मानव ! अन् जगची सारे ! !

## अवीट गोडवा

अवखळ वारं सुटलं केव्हा
उजाड भयग्रस्त माळरानी
भुर्रऽ उडती परिपक्व पाने
देखता खग हर्ष दाटे मनी
विहंगासम कोण अन्तराळी !
फेसाळ लाटेवरी स्मित करी
अवचित यावे संगीत कानी
भ्रम अेकान्ताचा उदय उरी ! !
वाचतात नौबती अंबरी
दूत असंख्य त्या भव्य नगरी
खूणगाठ का नित्याची रोवली
अवीट गोडवा हृदय-मन्दिरी
भयाण शान्तता उरी भासते !
क्षणात फुलती मनी मनोरे
मनोमंदिरी विकसति ज्योती
नित्यचि फुलति गगनी तारे ! !

# इवल्या मनात

प्रभो !

डोळ्यांच्या आकाशा कडा आसवांची ।
जाण असो तुला दीन–श्रमिकांची ।।
लहान ओंजळ रुंदावे क्षितिज ।
असा मी वाढू दे कळू दे अंदाज ।।
हवे असे मन तुझ्या प्राजक्ताचे ।
हवे असे धन अश्रू–फुलांचे ।।
लाटांचे तुफान मैफल नृत्याची ।
तेवू दे झोपडीत ज्योत सत्याची ।।
लावितो मी दीप तुझिया भक्तीचा ।
प्रांगणात सदा असू दे श्रद्धेचा ।।
आता का सोसणे ? आता फुलायाचे ।
कळीतुन फुलासम उमलायाचे ।।
वाळूच्या कणात पेंगते आकाश ।
इवल्या मनात सांडू दे प्रकाश
नको मला शेखी तुरा नको मानाचा
' माणूस ' मी रे भुकेला शब्दांचा

' ज्ञानदूत ' दीपावलि १९६८

## रुपेरी वाट

भिरभिरत्या नजरेने
स्नेहाच्या अपूर्व ओढीने
येथवरी आले तुझ्याचसाठी
याच रुपेरी वाटेवरती

थकली गात्रे थकले लोचन
एकटे तुजविण जीवन
रुपेरी वाट, न्याहाळते मी तुला
खोडकरवारा, धुंडाळते मी तुला

कमान भविष्याची उंचउंच जाते
येथे मी एकटी तुझेच गीत गाते
सौख्याची ऊब, मी नाचते, नाचते
तुझ्या संगतीत माझे जीवन रंगते

जीवन नौकेचा तू नावाडी
कशी रे जाऊ एकटी पैलतटी
जीवनाचा तूंच आहेस सुगंध
मी न जाणते मायापाश-बंध

लोचने माझी दूरून पाहती तुला
सुखसंवदने नच अंतरली मला
हर्षसागरात माझे मीपण लोप पावते
मानस माझे तुझ्यासाठी असे बेभान होते

# घरकुल

होतं मायेचं टुमदार घरकुल
        होती दोन गुलजार चिमणी बाळं
होती आशेला सौख्याची अवीट ऊब
        होती शाबूत कमान कितीक काळ
होती तेवत ज्योत मानसमंन्दिरी
        होती फुलली स्वप्ने चिमण्या-जिवांची
होता बहर सुखाच्या पारिजातका
        होती अपूर्व ऐट अमोल प्रीतीची
होत्या सुखावल्या मनाच्याच चांदण्या
        होता झेपावत आशेचाच चन्द्रमा
करित नर्तन भाबड्या जिवांची कारंजी
        असले जगति अशा सुखा, देण्या काय उपमा ?
होती मन्दावत ध्येयाची साञ्जवात
        होतं कधीं जुमानलं ताज्या दमानं ?
निखारा करीं, हसता निर्घृण काळ
        होती आज भंगली मनं, दैवी उन्हानं !
होतं कशास्तव जिणं पक्षिणीचं ?
        होती कशास उब चिमुकल्या पंखात !
धाळूनि घाव हृदयी काय साधलं ?
        होती, उडाली ठिणगी वेड्या मायेत
होती आज पक्षिणी फिरत अन्तराळी
        घुटमळते एक आस चिमण्या जीवा

होत्या कशास आज कोमेजल्या कळ्या
‘ आज गमते उदास–भकास ’
रित्या मनातील उध्वस्त ‘ घरकुल ’

## अशी एक रात्र येते

अशी एक रात्र येते
ज्ञानेशांची ओवी पिऊन
तुकोबांच्या गाथेत भिजून
अशी एक रात्र येते
स्वप्नांची कलावूत लेवून
बकुळीचा गंध घेऊन
अशी एक रात्र येते
भिजलेल्या मातीचा ओलावा सांभाळित
फुललेल्या लाटांचे हसू फुलवित
अशी एक रात्र येते
शिरीषच्या निथळत्या रक्ताची
आई होऊन
अशी एक रात्र येते
शहीद हमीद–दिलीप गुप्तेच्या
पवित्र रक्तातील
थेंबाचे हृदय होऊन

‘ माणूस ’ ऑगस्ट १९६७

## हे कधी बदलणार आहे ?

राष्ट्र आज धोक्यात आहे
राष्ट्र आज पोखरले आहे
तरी वाढदिवसांचे कौतुक आहे
सत्काराचा मध आहे
उत्स्फूर्त स्वागतांचे गीत आहे
दौऱ्यांचे जाळे आहे
जवानांची जान–
मात्र कवडीमोलाने जात आहे
तरी सारे अलबेल आहे
हे कधी बदलणार आहे ?
मरणोत्तर किताब आहे
किताबावर अभागी जीवांनी
जगायचं आहे
पैशांची त्यांना काय गरज आहे
हत्तींना पोसायला सरकार राजी आहे
जनतेसाठी रेशनिंगची रांग आहे
दारिद्र्याने पीडलेले
गरिबीने नाडलेले
दुर्दैवी जीव....धान्यासाठी
उन्हात तडफडत आहेत
उन्हाच्या तिरपीनं पडत आहेत
त्याचवेळी या देशात
सुवासिक फुलांचे हार गळ्यात पडत आहेत

माणसे मरत आहेत
हाय कर्मा !
मोटारी बदलल्या जात आहेत
तरी सारे अलबेल आहे
हे कधी बदलणार आहे ?
पूर्वी खुर्चीलाही विशेष अर्थ होता
आता अर्थालाच खुर्ची चिकटून आहे
पूर्वी त्यागातही औदार्य होते
आता त्यागात प्रदर्शन आहे
टिळक–फुले–सावरकरांचा महाराष्ट्र
आज कुठे दिसत नाही
भाषणासाठी–कीर्तनासाठी
पावसात आज कोणी भिजत नाही
पण आम्हाला भिजण्याची सवय आहे
आम्ही आज भिजत आहोत
छत्री शिवाय—
सिनेमाच्या रांगेत तिकीटांसाठी
शाळेतील सांस्कृतिक तास
किती नमुनेदार असतो
तेथे संस्कृतीचा भास असतो
फिल्मी दुनियेचा जल्लोष असतो
सुधारणांचा अवमान न करता
बाई लगबगीनं वर्गात जातात
सांस्कृतिक तासांसाठी
बाई विचारतात—
काय रे ? कुठे राहतोस तू माने ?

'आयला, एस् मॅडम,–तेरे घरके सामने'
मग सिनेजगातील मळा पिकतो
चंचलतेच्या नदीकाठी
' ती टॉप नाचते
आयला? काय दिसते नाही!'
असे मुलांवर संस्कार होतात
आणि सांस्कृतिक तास संपतो
भव्यतेतील उंची––
अता अशी त्रिथरली आहे
थोरांची उपेक्षा आहे–पोरांचे नाव आहे
हे सारे असे आहे
राष्ट्र आज धोक्यात आहे
राष्ट्र आज पोखरले आहे
एक गोड स्वप्न–– !
समाजवाद त्याचे नाव आहे !
पण आज समाज आणि वाद आहे
हे कधी बदलणार आहे? ....

## तेव्हा मन भारावून जाते

कारुण्याच्या सीमारेषेवर
जेव्हा विनोदाचा गुलमोहर फुलतो
आसवांची फुले येतात
निष्ठेच्या वेलीवर
तेव्हा मन भारावून जाते

गांभीर्य गाऊ लागते
सौदार्हाचे गीत
दारिद्र्यात माणुसकीचा
गहिवर दाटतो
त्यागही हसतो भविष्याच्या रेशमी स्पर्शाने
तेव्हा मन भारावून जाते
जीवनात नाट्य उभे राहते—फुलते
मनाचा पारिजातक डवरून येतो
श्रद्धेचा औदार्याचा गंध घेऊन
अर्थ जीवनाचा घासला जातो
नियतीच्या विशाल ऐरणीवर
तेव्हा मन भारावून जाते
फुलणारी पहाट भक्तीला जन्म देते
नामाचा गजर करीत
वाळवंटात भक्ति भिजते
इंद्रायणीच्या डोहापाशी
तेव्हा मन भारावून जाते
दारिद्र्याच्या वैचित्र्याच्या अंधारात
उपेक्षित—मानवतेचे प्रेषित
जीवनाचे—मानव्याचे गीत गातात
सलणारी व्यथा जीवनाशी कवटाळून
तेव्हा मान भारावून जाते

'मांडवी' जून १९६७

# पूजा

माईले जयांनि आसवांचे गीत
दुःखाच्या पाणवठ्यावर
आकंठ प्राशियले जीवित
वेदनांच्या समीधावर
मीराई–ज्ञानेशाची आसवे
अजि पाहियली म्या डोळा
ताम्हनात साण्डे कवतुक
परि जीव होई असा गोळा
तेच महात्मे–ते पुण्यात्मे
अश्रूत भिजविती रात्र काजळी
त्या गीतांचे–त्या भाष्यकारांचे
स्वप्न नान्दते भक्त राऊळी
ना घरकूल ज्या आसवांना
गीत तयांचे होऊनि गाती
पंखात ज्या उबही नाही
स्वप्न तयांचे होऊनि फुलती
व्यर्थ काय बलिदान अशांचे !
जे जीवनाचा अर्थ सांगती
हसण्या आधी–फुलण्या आधी
सुगंध सारा उधळूनि जाती
मानवतेची पूजा बांधण्या
देव्हाऱ्यात जे जीवन वाहिले
कृतार्थतेने जन्म घेऊनि
असे 'पामरे' जीवन क्षाळिले

अजून ना ओघळ सुकले
त्या वधस्तंभावरचे
उंबऱ्यावरील आंसवाचे
अढळ अमुच्या इमानाचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
62066 दि: 27101
7595 क्रं: 9186

## प्रणाम

प्रणाम-प्रणाम-प्रणाम
प्रणाम हा तुला स्वातंत्र्य रक्षका- ॥धृ०॥
लोकमान्य तू, लोकाग्रणी तू,- लोकोद्धारक तू
लाख मुखांची, लाख मुकांची, केवळ जाणचि तू
यशसिद्धीचा-औदार्याचा धवल पौरुष तू
नमतो माथा आठव येता-स्वातंत्र्य सेवका १
तुरुंग कथितो मंडालेचा तुझी गौरव गाणी
अक्षय उरे ग्रंथ काव्य फुले अभंग-वाणी
कण मातीचे अजून गाती चैतन्याची गाणी
'स्वराज्य' रंगले तुझ्या यशाने स्वातंत्र्य जनका २
युगा-युगांचे ऋणी आम्ही हाचि तुझा सन्मान
जन्मसिद्ध हक्क माझा स्वराज्याचे यशोगान
गाईल पुढती तुझे पवाडे भारतवर्ष महान
कृतज्ञ आम्ही-कृतार्थ आम्ही- स्वातंत्र्य प्रवर्तका. ३

'तरंग' एप्रिल १९६७

# शल्य

(१९४२ च्या आंदोलनातील एका अज्ञात हुतात्म्यास)

हे जीवित,

बेगडी सुखाच्या
नकली रंगांनी आम्ही सजवित राहतो
त्यातहि अस्मितेचे स्फुल्लिंग
जन्माला येतात त्यागाचे बाळकडू घेऊन
इतिहासाच्या गाभाऱ्यात
नाव तुझे राहून गेले
आमच्या मनाच्या ओंगळ पाण्यात
शव तुझे वाहून गेले
रक्तानं भिजलेल्या मातीला
तुझ्या त्यागाचा वास आहे
अस्मितेचा श्वास आज—
आम्ही किती रोखला आहे
उडालेल्या रक्ताच्या कारंजातून
क्रांतीची फुले जन्माला आली
ठेहरो ! चलो हटो ! !
म्हणता म्हणता तुझ्या देहाची—
चाळण झाली
कोण थोपविणार आहे ?
तिच्या डोळ्यांचा पावसाळा
आई तुझी...
आई तुझी वैधव्याच्या वणव्यात

होरपळत असता
तूही निघून गेलास
जिथे तू हुतात्मा झालास
त्या जागेकडे बोट दाखवून
ती माय मराठी
धाय मोकलून रडते आहे
तिच्याकडे पहायला
कुणाला सवड आहे?
तुझ्या नावावर जे तरले
ते आज घराकडे वळत नाही....
लाजिरवाणे जिणे तिचे
उघड्या डोळ्यांनी पहावत नाही
वार्धक्यात— दारिद्र्यात
जीवनाचा भार पेलवत नाही
........दिव्यत्वाला कवटाळून
तू गेलास—
पण काळजाची जखम
वेदनांच्या कपड्यात गुरफटून गेली
आज कुणाला तुझे स्मरण नाही
अज्ञाताच्या अंधारात कीर्तीची खुलावट नाही
चांगुलपणाचे माप!
लबाडीच्या तराजूत ठरत नाही
आणि म्हणून
कोणाच्या भीकेची तुला गरज नाही

# आकाशाच्या निळ्या डफावर

(स्वा. सावरकरजींना वाहिलेली श्रद्धांजलि)

तुला जिंकिले काय सागरा तो मृत्यूंजय झुंजार
आकाशाशी जुळते नाते शब्दाचि फुलते अंगार

निळ्या नभाला फुटली नाही का दिगंत तेजाची गाणी
हिमालयावर कां न कोरली तुझी वज्राक्षय वाणी
अथांगतेला कुठली सोबत पाऊल पडले अनवाणी
अंदमानचा ढळता पत्थर गातो आर्त विराणी

युगायुगांच्या लाटेवर दीपस्तंभ तुझा असावा
आव्हान देण्या सागरा सामान्यांचा पुरुषार्थ फुलावा
क्रांती उद्यांची–दीप्ती उद्यांची ज्योतीतुनी मार्ग दिसावा
आकाशाच्या निळ्या डफावर क्रांतीचा जयघोष घुमावा
जीवनातले फुलते यौवन क्रांतीच्या होमात पेटले
विनम्र होऊनि हिमालयाचे मस्तक पळभर झुकले-झुकले
पुलकित झाली माती इथली हौतात्म्याने तिला क्षाळिले
महाकवीच्या प्रतिभास्पर्शे अग्रणींनी जीवन वाहिले

शब्द पोरके झाले आता शून्याशी चिर जडले नाते
इतिहासाच्या पानांवर फुलेल जीवन धगधगते
तव उद्घोषे विनायकारे विवेकक्रांती येथ रंगते
आठव येता दीप्तीची घरकुल पापण्यांचे ओलावते.

*



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६५८५
REFBK-0017545